अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. २३ मार्च २०२६ । वर्ष : २४ वे अंक : १७३ वा किंमत : ५ रुपये पाने १२

## वजन वाढले तर केबिन क्रूचा पगार कापणार



नवी दिल्ली : देशातील प्रमुख विमान कंपनी असलेल्या एअर इंडियाने आपल्या कर्मचाऱ्यांबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. एअर इंडियाने नवे आरोग्य आणि तंदुरुस्ती धोरण लागू करण्याच्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली असून, याचा थेट परिणाम केबिन क्रूच्या कामाचे वेळापत्रक आणि पगारावर पडण्याची शक्यता आहे. या धोरणांतर्गत बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) च्या मापदंडांच्या बाहेर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना डि-रोस्टर केले जाण्याची शक्यता आहे. एवढंच नाही तर त्यांच्या वेतनामध्येही कपात केली जाण्याची शक्यता आहे.

हे धोरण १ मे पासून लागू होणार असून, यामध्ये केबिन क्रूच्या पात्रतेला बीएमआय रिडींग आणि फंक्शनल फिटनेसच्या मूल्यांकनाशी जोडण्यात आले आहे. या नुसारा १८ ते २४.० पर्यंतचा बीएमआय हा सामान्य मानण्यात आला आहे. जर कुणाचा बीएमआय १८ पेक्षा कमी असेल तर त्याला अंडरवेट मानले जाईल. मात्र अशा बाबतींत संबंधित कर्मचाऱ्याला नाकारले जाणार नाही. पण अशा कर्मचाऱ्याला वैद्यकीय चाचणी आणि फंक्शनल मूल्यांकनामध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल.

## गर्भवती महिलेचेही लैंगिक शोषण !

# भोंदू खरातला नेले अज्ञातस्थळी



नाशिक/प्रतिनिधी

नाशिकमध्ये गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणाच्या तपासात आता मोठी घडामोड समोर आली आहे. एसआयटी म्हणजे विशेष तपास पथकाने चौकशीचे ठिकाण अचानक बदलत खरातला अज्ञातस्थळी हलवले असून, या कारवाईदरम्यान प्रचंड गोपनीयता आणि खबरदारी घेतल्याची माहिती समोर येत आहे. गेल्या तीन दिवसांपासून गुन्हे शाखा कार्यालय आणि पोलीस क्लब येथे सुरू असलेली चौकशी आता नव्या ठिकाणी हलवण्यात आली आहे. या चौकशीला एसआयटी प्रमुख आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते स्वतः उपस्थित राहून तपासावर बारकाईने लक्ष ठेवत आहेत. कालच खरातची तब्बल सात तास चौकशी करण्यात आली होती, तर आजही त्याची सखोल चौकशी सुरू असल्याचे समजते.

### खरात आता पोलिसांच्या ताब्यात

यानंतर आता नाशिकच्या सरकारवाडा पोलिसांनी अशोक खरात याचा ताबा घेतला आहे. एसआयटी चौकशी सुरू असताना आणखी एक गुन्हा दाखल झाल्याने नाशिक पोलिसांनी एसआयटीकडे पत्रव्यवहार करत ताबा घेतला आहे. यानंतर पोलिसांनी खरातला नाशिक क्राईम ब्रँच कार्यालयात आणले आहे. आता क्राईम ब्रँचकडून भोंदू बाबाची कसून चौकशी केली जाणार आहे. यातून अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

### मंदिरातील पुजाऱ्यासह कर्मचाऱ्यांना उचललं!

### ईशान्येश्वर मंदिरातील पुजारी ताब्यात

या दरम्यान, तपासाचा विस्तार करत एसआयटीने आणखी एक महत्त्वाची कारवाई केली आहे. खरातच्या 'ईशान्येश्वर' मंदिरातील पुजारी आणि काही कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन चौकशीसाठी आणण्यात आले आहे. या चौकशीमधून मंदिर आणि खरातच्या फार्महाऊसवर नेमक्या कोणत्या प्रकारच्या हालचाली सुरू होत्या, याचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### गर्भवतीचेही लैंगिक शोषण

एका महिलेच्या लैंगिक शोषणाच्या आरोपात खरातला अटक करण्यात आली होती. यानंतर इतरही काही महिलांनी खरात विरोधात तक्रार दाखल करण्याचे समोर आले आहे. आता नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात अशोक खरात विरोधात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गरोदरपणात पूजा विधीच्या नावाखाली नराधम खरातने एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. पीडिता आणि तिच्या कुंटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही पीडितेने तक्रारीत म्हटले आहे.

### मोठे खुलासे होणार...

दरम्यान, गर्भवती महिलेवरही अत्याचार केल्याच्या या घटनेने संपूर्ण राज्यात संताप व्यक्त होत आहे. खरात प्रकरण आता केवळ लैंगिक शोषणापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर मानसिक छळ, धमकावणे, जादूटोणा आणि अघोरी कृत्यांपर्यंत पोहोचले आहे. एसआयटी आणि पोलीस यंत्रणा या प्रकरणात तातडीने कारवाई करत असून, लवकरच आणखी खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### फडणवीसांनी विरोधकांनाही सुनावले

### खरात प्रकरण अत्यंत गंभीर, विनाकारण राजकारण करु नका



या संपूर्ण प्रकरणाची अत्यंत वरिष्ठ स्तरावर मॉनिटरिंग होत आहे. यासंदर्भात मी डीजींना सांगितले आहे की, त्यांनी याचे मॉनिटरिंग करावे. याच्यामध्ये एसआयटी तयार करण्यात आली आहे. नाशिक सीपी आणि एसआयटी मिळून हे काम पूर्ण करत आहेत. मला असे वाटते की या संदर्भात कुठल्याही परिस्थितीत कुणालाही सोडले जाणार नाही. आता याला रंग देण्याचा काही प्रयत्न चाललेला आहे. कुणाजवळ काही पुरावा असेल तर त्यांनी तो निश्चित आणून द्यावा. त्याच्यावरही कारवाई होईल. पण विनाकारण प्रत्येक गोष्टीला केवळ राजकीय रंग... आता अनेक लोकं जायचे. विरोधी पक्षाचे कोण कोण गेलेत त्यांचे मी पुरावे देऊ शकतो? सर्वांत जास्त तर माझ्याकडे पुरावे आहेत याचे, पण ते पोलिसांकडे आहेत. ते पोलिसांचे काम आहे, ते माझे काम नाही.

### एसआयटी चौकशीची व्याप्ती वाढली

खरात विरोधातील चौकशी लवकर पूर्ण करण्याचा एसआयटीचा प्रयत्न असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दिनेश परब, राजेंद्र जासूद या दोघांविरोधात वावी पोलीस ठाण्यात अशोक खरातने तक्रार केली होती. खरातने काही व्हिडिओ आणि अश्लील फोटो असल्याची धमकी देत पैसे मागितल्याची तक्रार दिली होती. आता अशोक प्रकरणात खरातसह एकूण आठ जणांची एसआयटी कडून चौकशी सुरु आहे.

### राजकीय महाभूकंप होणार?

### राज्याच्या मंत्रिमंडळातील ९ मंत्र्यांचा खरातच्या नेटवर्कमध्ये...

ज्योतिषी अशोक खरात याचे अनेक नेत्यांसोबतचे फोटो व्हायरल होत आहेत. त्यातील काही व्हिडीअसे एआय तंत्रज्ञानाच्या आधारे तयार करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. तर संजय राऊत यांच्या दाव्यानुसार, राज्याच्या मंत्रिमंडळातील ९ मंत्र्यांचा खरातशी थेट संबंध होता. ते मार्गदर्शन आणि सल्ल्यासाठी त्याच्याकडे जात होते. तर यातील काहींची त्याच्याशी व्यवसायिक भागीदारी होती असा आरोपही होत आहे. खरातचे राजकीय आणि प्रशासकीय अधिकारी यांच्याशी लागेबांधे होते नीरज जाधवला संपूर्ण माहिती होते. कोणते मंत्री, खासदार, आमदार याच्याशी खरातने कोणती अर्थपूर्ण डील केली याची खडानखडा माहिती त्याच्याकडे असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे नीरज जाधवकडून आणखी ही काही धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विरोधकांनी हा मुद्दा अधिवेशनात उचलून धरण्याचा इशारा दिला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला याप्रकरणी चांगलेच धारेवर धरले आहे.

**▪ खरातच्या व्हिडिओमध्ये शिरूरचे नेते...**

एका व्हिडिओमध्ये शिरूर तालुक्यातील काही राष्ट्रवादी काँग्रेसचे आजी माजी पदाधिकारी दिसत असल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. एका धार्मिक कार्यक्रमात अशोक खरात यांच्या मागे शिरूर तालुक्यातील काही नेते बसले असल्याचे समोर आले आहे.

**▪ भोंदूगिरी करणारे जेरबंद होतील : बावनकुळे**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारले असता त्यांनी म्हटले की, या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्या सर्वांवर कारवाई सरकारच्या वतीने करण्यात येईल आणि सर्व दोषींना जेरबंद करण्यात येईल. तसेच अशा पद्धतीने अनेक भोंदू बाबा आश्रम उघडतात त्यामध्ये काय कार्य करतात हे अनेक वेळा पोलिसांना देखील माहित नसते असेही बावनकुळे म्हणाले.

(अधिक वृत्त पान ८ वर...)

## महाराष्ट्र केसरी फायनलचा हर्षवर्धन सदगीर ठरला विजेता

### महेंद्र गायकवाड उपमहाराष्ट्र केसरी

पुणे/प्रतिनिधी



पुण्यातील वाघोली येथे ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांनी केले होते. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे याच्या उपस्थितीमध्ये फायनल कुस्ती लावण्यात आली होती. फायनलमध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने ४-३ ने विजय मिळवला. लाल कॉस्ट्यूममध्ये हर्षवर्धन सदगीर आणि निळ्या कॉस्ट्यूममध्ये महेंद्र गायकवाड खेळत होता. नाशिकला त्याच्या रूपाने दुसरी महाराष्ट्र केसरींची गदा मिळाला आहे. तर हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला आहे. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह अनेक नेते मंडळी आणि आजी-माजी खेळाडूंह मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.

सहा मिनिटांचे दोन राऊंड असतात, त्यामधील पहिल्या राऊंडमध्ये दोघांनी एक एक गुण घेतला होता. पहिल्या राऊंडमध्ये गुणांची बरोबरी होती. दुसऱ्या राऊंडमध्ये दोघेही आक्रमक झाले होते. शेवटच्या दीड मिनिटांमध्ये तीन गुण मिळवत हर्षवर्धन सदगीरने आघाडी घेतली. गायकवाडनेही तीन गुण मिळवले पण वेळ संपल्याने तो पराभूत झाला.

सोलापूर शहराचे **तापमान**

कमाल तापमान **३७.२**

## पोलिसांकडून प्रेयसीच्या खोट्या बनावाचा पर्दाफाश अखेर...ती प्रेयसी व प्रियकर समीर शेख अटकेत

**प्रियकराला पोलीस केसमधून वाचविण्यासाठी प्रेयसीकडून सामुहिक बलात्काराचा गुन्हा**

### पोलीस आयुक्त एम. राजकुमार : बलात्काराचे खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांना चाप बसेल

सोलापूर/प्रतिनिधी

प्रियकराला पोलीस केसमधून वाचविण्यासाठी एका २५ वर्षीय प्रेयसीने सामुहिक बलात्कार केल्याचा चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला. या प्रकरणात पोलिसांना तपासात संशय आल्याने, विजापूर नाका पोलिसांनी या गुन्ह्याचा सखोल तपास केला. सामुहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करणाऱ्या त्या प्रेयसीच्या खोट्या बनावाचा पर्दाफाश केला. शेवटी तपासाअंती ती प्रेयसी व तिचा प्रियकर समिर चाँदसाब शेख वय २८ रा. कुमठे या दोघांविरूध्द, सामुहिक बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल केल्याप्रकरणी दोघांविरूध्द गुन्हा दाखल केला. सध्या ती प्रेयसी व तो प्रियकर समीर शेख हे दोघे प्रेमीयुगल सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत. या प्रकरणाबाबत बोलताना पोलीस आयुक्त एम. राजकुमार म्हणाले - अशाप्रकारे बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करून निष्पाप तरूणांना अडकविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना मोठा चाप बसला आहे.

या धक्कादायक घटनेची हकीकत अशी की, कुमठे येथे राहणारा समीर चाँदसाब शेख वय २८ व त्याची २५ वर्षीय प्रेयसी हे दोघे एकमेकांना सन २०२२ पासून ओळखतात. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. यातील प्रियकर समीर शेख याच्याविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात, भादवि कलम ३०६ अन्वये आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी पोलिसांनी समीर शेख याला दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी अटक केली होती. त्यानंतर आरोपी समीर शेख याला उच्च न्यायालय, कोल्हापूर सर्किट बेंच येथून दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी जामीन मिळाला होता. त्यानंतर तो जेलबाहेर आला. या जामीनाच्या विरूध्द वरील गुन्ह्यातील फिर्यादी सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे अपिल दाखल केले. या प्रकरणी दि. १७ मार्च २०२६ रोजी, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांनी सुनावणीअंती आरोपी समीर शेख याचा मिळालेला जामीन रद्द केला आहे. या केस मधील फिर्यादी, साक्षीदार व त्याचे नातेवाईक अशा चौघांवर सामुहिक बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल **(अधिक वृत्त पान ८ वर...)**



सोलापूर : पत्रकार परिषदेस पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप पवार, पोलीस निरीक्षक दादासाहेब गायकवाड, पोलीस निरीक्षक सुशांत वराळे हे उपस्थित होते.

### हा खोटा गुन्हा आहे हे त्या प्रेयसीने पोलिसांसमोर केले कबूल

प्रियकराला वाचविण्यासाठी प्रेमात बुडालेल्या त्या प्रियसीने स्वतःवर सामुहिक बलात्कार झाल्याचा गुन्हा दाखल केला खरा...पण पोलिसांच्या तपासात तो खोटा गुन्हा आहे हे निष्पन्न झाल्यावर. अखेर त्या प्रेयसीने पोलिसांसमोर आपला गुन्हा कबूल केला. मी खोटी फिर्यादी दाखल केली व प्रियकराला वाचविण्यासाठी त्या चौघांना अडकविले, असा कबुली जबाब तिने पोलिसांना दिला.

### आणि... सामुहिक बलात्काराच्या गुन्हयातून ते चौघे अलगद सुटले

सामुहिक बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्यानंतर, पोलिसांनी गुन्हयातील त्या चौघांना अटक केली होती. पण...पोलीस तपासात हा गुन्हा खोटा दाखल करण्यात आला आहे हे निष्पन्न झाल्यानंतर, पोलिसांनी त्या चारही आरोपींचा जबाब घेवून त्यांना सामुहिक बलात्काराच्या गुन्ह्यातून मुक्त केले. अशा प्रकारे ते चौघे बलात्काराच्या गुन्हयातून अलगद सुटले.

### त्या प्रेमीयुगलांनी शांत डोक्याने रचला प्लॅन...तो प्लॅन फसला

प्रियकर समीर शेख याला भादवि कलम ३०६ मधून बाहेर काढण्यासाठी त्या प्रेमियुगलांनी शांत डोक्याने प्लॅन रचला. ज्या फिर्यादीने समीर शेख यावर कलम ३०६ चा गुन्हा दाखल केला. त्या फिर्यादी व त्यातील साक्षादार अशा चौघांविरूध्द सामुहिक बलात्काराचा गुन्हा दाखल केल्यास, समीर शेख याला मदत होईल, असा प्लॅन त्या प्रेमियुगलांनी रचला. आणि प्रियकराच्या प्रेमाने आंधळ्या झालेल्या त्या प्रियसीने कशाचाही व स्वतच्या जिवनाची कोणताही काळजी न करता, स्वतवर सामुहिक बलात्कार झाल्याची फिर्याद दाखल केली. अखेर त्या प्रेमीयुगान शांत डोक्याने रचलेला प्लॅन त्यांच्याच अंगलट आला. आणि तो प्लॅन पोलिसांच्या तपास फसला. सध्या दोघे प्रेमियुगल आत जावून बसले आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्याच्यामुळे आमच्याकडे लोक संशयाने बघत आहेत !

८२०

## झेडपीत देवाभाऊच बिग ब्रदर

## 'भाई'चा प्लॅन फसला



सोलापूर/प्रतिनिधी

राज्यात नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाले. मात्र, महायुतीमध्ये भाजपच मोठा भाऊ ठरला. भाजपने संपूर्ण महाराष्ट्रावरील पकड आणखीनच पक्की केली आहे. विशेषतः अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हा परिषद निवडणुकीत कोणाचे वर्चस्व असणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अजितदादानंतर पश्चिम महाराष्ट्रावर वर्चस्व मिळवण्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा प्लॅन या निवडणुकीत सीएम देवेंद्र फडणवीस यांनी उधळून लावला,असा राजकिय जाणकारांचा अनुमान आहे.

बारामतीजवळील विमान अपघातात २८ जानेवारीला अजित पवार यांचे निधन झाले. ऐन जिल्हा परिषदेच्या निवडणूक काळातच

(अधिक वृत्त पान ८ वर...)

**झेडपी निवडणूक : १२ जिल्हा परिषदेच्या निवडणुका फेब्रुवारीमध्ये पार पडल्या. त्यातील आठ जिल्हा परिषदांमध्ये भाजपचा अध्यक्ष झाला आहे.**

**पुणे :** पुणे महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे. तेथे अध्यक्ष म्हणून वीरधवल जगदाळे यांना संधी मिळाली तर, विरोधी पक्षात भाजप आहे.

**सातारा, सांगली :** साताऱ्यामध्ये शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आली. मात्र, भाजपने बाजी मारत आपला अध्यक्ष बनवला. प्रिया शिंदे यांना अध्यक्षपदी संधी मिळाली. तर, महाविकास आघाडीने भाजपला धक्का देत सांगली जिल्हा परिषदेत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा अध्यक्ष बनवला.

**कोल्हापूर, संभाजीनगर :** कोल्हापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिल्प खोत अध्यक्षा झाल्या. संभाजीनगरमध्ये एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला चकवा देत भाजपचा अध्यक्ष विजयी झाला.

**परभणी लातूर :** परभणीमध्ये आणि लातूर दोन्ही ठिकाणी भाजपचा अध्यक्ष झाला. परभणीमध्ये लता वाकळे अध्यक्षा झाल्या. राष्ट्रवादीचे श्रीकांत विटेकरांना उपाध्यक्षपद मिळाले.

**सोलापूर, धाराशिव :** सोलापूर आणि धाराशिमध्ये देखील भाजपचा अध्यक्ष झालाआहे. धाराशिवमध्ये अर्चना पाटील अध्यक्षा झाल्या आहेत.

**सिंधूदुर्ग, रायगड :** सिंधुदुर्गमध्ये शिंदेंच्या शिवसेनेच्या अस्मिता केंद्र अध्यक्ष झाल्या तर रायगडमध्ये भाजपचे मंगेश वाकीडकर अध्यक्ष झाले. तर, राष्ट्रवादीचे मधुकर पाटील उपाध्यक्ष झाले.